लोकमत

# विद्यार्थ्यांसाठी सायबर सिक्युरिटी कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**उमरगा :** वाढते सायबर गुन्हे आटोक्यात आणण्यासाठी सायबर सिक्युरिटीचे ज्ञान असणे प्रत्येकालाच आवश्यक झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. प्रतीक्षा पांगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या प्रारंभी उपस्थितांना सायबर सिक्युरिटीची शपथ देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी.ए. पिटले, उपप्राचार्य प्रा. जी.एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, प्रा. व्ही.व्ही. निचत, प्रा. बी.आर. लोकरे यांची उपस्थिती होती. माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवी जीवन सुलभ झाले असले तरी त्यामुळे अडचणींमध्ये वाढ सुद्धा मोठ्या प्रमाणात झाली आहे. अशा घटना टाळण्यासाठीच ही कार्यशाळा घेण्यात आली असल्याचे पांगे म्हणाले.

Hello Dharashiv
Page No. 6 Aug 24, 2024
Powered by: erelego.com